## वादीतर्फे उलटतपास – श्री. एस. एस. इंजल वकील.

**१६.** माझे दुसरी पर्यंतचे शिक्षण झाले असून मला लिहिता–वाचता येते. मी माझा जबाब व लेखी कैफियत थोडा–थोडा असा संपुर्ण पाहिला असून मला त्याची पुर्ण माहिती आहे. माझ्या आजोबांचे नाव दाजी गावडोजी पाटील असून त्यांना चार मुले व दोन मुली होत्या. कृष्णा त्यांचा मोठा मुलगा असून त्याच्या नंतर हरी, वादी आणि रामू अशी मुले असून प्रतिवादी क्र. ११ व १२ जनाबाई व मुक्ताबाई या मुली आहेत.

**१७.** कृष्णा व हरी आजरोजी मयत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पुर्वी दावा मिळकती आजोबा दाजी पाटील यांच्या नावावरती होत्या. माझी आजी गौराबाई मयत आहे. मी दाव्यामध्ये वादीने दाखल केलेले सातबारा उतारे पाहिलेले आहेत. आजोबा वारल्यानंतर त्यांच्या सर्व वारसांची नावे उता–या वरती आली आहेत. दावा मिळकतींच्या सातबारा उता–यांवरती वादी व आमची सर्वांची नावे सामाईकात असून त्याचा एकत्रीत आठ अ उतारा आहे.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबांच्या हयातीपासून दावा मिळकत १/ब मध्ये विहिर आहे. सदर विहिर आम्ही १९९४ साली खोदलेली आहे. आमच्याकडे विहिर खोदल्या बाबतचा कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर विहिर आजोबांनी खोदलेली असून पुर्वीपासून वापरात आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर विहिरीचा आम्ही वादीसोबत सर्व सामाईकात वापर करतो.

**१९.** हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल शिकलेले होते व वादी हरी आणि रामू अशिक्षित आहेत. माझे वडिल आजोबांच्या मृत्यूनंतर मोठा मुलगा या नात्याने कुटुंबाचा सर्व व्यवहार पाहत होते. ते शेतीसाठी आवश्यक असणारे सर्व निर्णय घेत होते. हे म्हणणे खरे नाही की, आजोबांच्या निधनानंतर माझ्या वडिलांनी एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून गट क्र. ३४४ मधील विहिरी वरती सामाईकात मोटर बसवली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या विहिरीच्या पाण्यावरती सदर जमिनीतील संपुर्ण शेती केली जाते. हे म्हणणे खरे नाही की, त्या मोटरीसाठी माझ्या वडिलांनी एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून वीजजोडणी त्यांच्या नावावरती घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या विहिरीतील पाणी वादी व आम्ही हिस्याने वापरत आहोत. गट क्र. ३४४ च्या शेतीत वादी व आमची पिके आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर

विहिरीची दुरुस्ती व इतर खर्च वादी व आम्ही एकत्रीतपणे करीत आहोत.

**२०**. माझे वडिल २००३ साली वारले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल हयात असेपर्यंत गट क्र. ३४४ मधील विहिरीचे पाणी फेरीप्रमाणे सर्वांना देत होते. आजरा कारखाना झाल्यानंतर गट क्र. ३४४ च्या आजूबाजूच्या लोकांनी ऊसाचे पिक घ्यायला सुरुवात केली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर विहिरीचा विजपुरवठा माझ्या वडिलांच्या नावे असल्याचा गैरफायदा घेऊन आम्ही आसपासच्या शेतक-यांना चौथाईने पाणी पुरवत आहोत.

**२१**. मी आणि प्रतिवादी क्र. ३ व ४ एकत्र राहतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही इतरांना पाणी देत असल्यामुळे वादीला त्याच्या हिस्याचे पाणी द्यायला नकार दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी एकटा असल्यामुळे आम्ही सर्व मिळून त्याला धमकी देत आहोत. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा सदर विहिरीतील पाण्यामध्ये १/४ हिस्सा आहे. आमच्याकडे १९९४ साली घेतलेल्या बोअरवेलचा कागदोपत्री पुरावा नाही. माझ्याकडे गट क्र. ३२१ मधील जमिनीत बोअरवेल मारल्या बाबतचा कागदोपत्री पुरावा नाही.

**२२**. शंकर पाटील माझे सख्खे मामा आहेत. माझा मोठा भाऊ यशवंत पाटील आजरा कारखान्यात नोकरीला होता. आमच्या गावामध्ये विष्णू केसरकर आणि मसणू सुतार यांचे दोन राजकीय गट आहे. विष्णू केसरकर हे पुर्वीपासून आजरा कारखान्याचे संचालक आहेत. मला वादीचा मुलगा पुर्वी आजरा कारखान्यात नोकरीला असल्याचे माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याला कामावरुन कमी करुन आम्ही यशवंतला त्याच्या जागी रुजू करुन घेतले होते.

**२३**. शंकर पताडे हे आमच्या गावचे पुढारी नाहीत. मी १९९४ साली १८ वर्षांचा होतो. मी त्याकाळी झालेल्या आमच्या वाटपाच्या वेळी हजर होतो. त्या वाटपाचा आमच्यामध्ये कोणताही कागद तयार करण्यात आला नव्हता. आम्हाला त्यावेळी वाटपाबाबतचा नोंदणीकृत कागद करण्यास कोणतीही अडचण नव्हती. आमच्याकडे प्रतिवादी क्र. ११ व १२ यांनी त्यांचा हक्क सोडल्या बाबतचा पुरावा नाही. माझ्याकडे लेखी कैफियतीत आणि माझ्या जबाबात लिहिलेल्या वाटपा बाबतचा कागदोपत्री पुरावा नाही. मी तो मजकूर पुर्वी झालेल्या वाटणीप्रमाणे लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आमच्या वडिलोपार्जित जमिनींचे

कोणतेही वाटप झालेले नसताना तोंडी वाटप झाल्याचे खोटे सांगत आहे. आमच्या मधील तोंडी वाटपा बाबत फेरफार नोंद घेण्यात आलेली नाही.

**२४**. चंद्राबाई पाटील आमची नातेवाईक व घराण्याची सदस्य नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. १८२, ३२१, ३३१, ५२१, ९१५ आजही चंद्राबाईच्या नावे आहेत. मी त्या आमच्या सर्वांच्या नावावर झाल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा हजर करु शकत नाही. वादीचा दावा मिळकतीमध्ये १/४ कायदेशीर हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या हिस्याची आजपर्यंत सरस-निरस मानाने वाटणी झालेली नाही.

**२५**. आमच्याकडे दावा मिळकतींच्या वाटणी होऊन चर्तुःसिमे अंतर्गत ताबा दिल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा नाही. आमच्याकडे घर मिळकती वाटून ताब्यात दिल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटा जबाब दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक - ११.१०.२०२४.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.